# जिल्हा व सत्र न्यायालय, जालना.

## जिल्हा न्यायालयातील न्यायदान कक्ष व निजी कक्ष यामधील दारे (20 नग) अंदाजे 3X7 फुट व खिडक्या (74 नग) अंदाजे 4X6 फुट दरपत्रकासाठी खालील नियम, शर्ती व अटी लागू राहतील.

01) प्रत्येक निविदाकारास फक्त एकच दरपत्रक देण्याची परवानगी असेल, याची नोंद घ्यावी. सदरील दरपत्रक 1. रोलर ब्लाईंड व 2. कर्टन यासाठीचे सर्व साहित्यासह वेगवेगळे देण्यांत यावे.

02) या कार्यालयाचे गरजांची पूर्तता करण्यात येणारे व सर्वात कमी किंमतीचे दरपत्रक मंजुर करण्यात येतील. तसेच या कार्यालयाच्या गरजेनुसार नमुद संख्येमध्ये कमी जास्त होउ शकते.

03) निविदाकाराला अधिकृत पुरवठादार/एजन्सी लेटर हेडवर दरपत्रक सादर करणे व त्यावर जीएसटी क्रमांक नमुद करणे बंधनकारक राहील.

04) दरपत्रकामध्ये सर्व प्रकारच्या करांसह, इतर चार्जस्, रंग वगैरे यांचा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे. तसेच सदर दारे व खिडक्यांच्या दरपत्रक मंजुरी झाल्यानंतर त्या पडदयांचे रंग व त्यासंबंधीचे साहित्य हे बसविण्यापुर्वी समिती सदस्यांना प्रत्यक्ष दाखविणे गरजेचे राहिल.

05) दरपत्रक सादर करणाऱ्या निविदाकरांचा खरेदी कार्यालयाबरोबर कोणताही हितसंबंध नसावा, याची नोंद घ्यावी.

06) दरपत्रके सादर करतांना त्यामध्ये संदर्भीय पत्राचा उल्लेख करणे बंधनकारक राहील. सदरील सिलबंद दरपत्रक ही दिनांक 20/02/2024 रोजी सायंकाळी 05:30 वाजेपर्यंत या कार्यालयात स्विकारण्यात येतील. त्यानंतर प्राप्त होणारी दरपत्रके विचारात घेतली जाणार नाही, यांची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

07) सदरील दरपत्रके पाठवितांना ती **"मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश," जालना** यांचे नांवे पाठविण्यात यावी, तसेच पाकिटावर **"दारे व खिडक्यांचे पडदे याचे दरपत्रक"** असा उल्लेख करावा.

08) सदरील दरपत्रके ही सिलबंद पाकिटात टाकून पाकिटावर **प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, जालना** या पत्त्यावर पाठविण्यांत यावी.

09) सिलबंद दरपत्रके हे जिल्हा न्यायालय "त्रिसदस्यीय वस्तू खरेदी सल्लागार समिती" यांचे समक्ष जिल्हा न्यायाधीश–1, जालना यांचे निजीकक्षात दिनांक 21/02/2024 रोजी उघडण्यात येतील. जर तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास दुसऱ्या दिवशी किंवा नियोजीत वेळेत व ठिकाणी समितीपुढे उघडण्यात येतील.

10) उपरोक्त दारे व खिडक्यांसाठीचे जिल्हा व सत्र न्यायालय, जालना या न्यायालयाने आदेश दिल्यानंतर पाच दिवसांच्या आत सुस्थितीत आणून बसवुन देण्याची जबाबदारी संबंधीत पुरवठादार/संस्थेची राहिल, यांची नोंद घ्यावी.

12) सदरील दरपत्रके स्विकारण्याचा व नाकारण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जालना राखून ठेवत आहे.

आदेशान्वये

प्रबंधक

जिल्हा व सत्र न्यायालय

जालना

G:\Quotation for Curtain.odt 2

# जिल्हा व सत्र न्यायालय, जालना

## निविदा / दरपत्रक

जिल्हा व सत्र न्यायालय, जालना या करिता दारे व खिडक्यांचे पडदे (रोलर ब्लाईंड किंवा कर्टन) खरेदी करण्यासाठी तपशिलवार निविदा / दरपत्रक मागवित आहे.

उपरोक्त दारे व खिडक्यांचे पडदे खरेदी (दारे (20 नग) अंदाजे 3X7 फुट व खिडक्या (74 नग) अंदाजे 4X6 फुट) करण्यासाठी सदरील पुरवठादाराने आपले दरपत्रक सोबत दिलेल्या "नियम व अटींच्या" अधिन राहून या कार्यालयाच्या खालील पत्त्यावर सीलबंद पाकिटावर **प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, जालना** यांचे नावे दिनांक 20 / 02 / 2024 रोजी सायंकाळी 05:30 वाजेपर्यंत मिळतील, अशा बेताने पाठविण्याची व्यवस्था करावी. यानंतर प्राप्त झालेले दरपत्रक (निविदा) ग्राहय धरण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

आदेशान्वये

**प्रबंधक**
जिल्हा व सत्र न्यायालय
जालना

दिनांक : 13 / 02 / 2024.